पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

**प्रेसनोट दि. ०५/०४/२०२४**

## पिंपरी चिंचवड वाहतुक शाखेमार्फत दिनांक २९/०३/२०२४ ते ०४/०४/२०२४ दरम्यान काळी काच लावणाऱ्या वाहनचालकांविरोधात राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच गुन्हेगारीस आळा घालणेकरीता मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने व मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चारचाकी वाहनास काळी काच लावणारे वाहनचालकांविरोधात दिनांक २९/०३/२०२४ ते ०४/०४/२०२४ दरम्यान विशेष मोहिम राबविण्यात आली असुन चारचाकी वाहनांस काळी काच (टेन्टेड ग्लास) लावलेल्या एकुण ३४३५ वाहनांवर वाहतुक विभागांमार्फत कारवाई करुन एकुण ३७,९१,५००/- रु एवढा दंड आकारण्यात आलेला आहे. तसेच यापुढे देखील अशाच प्रकारे वेगवगळ्या हेडखाली वाहतुक शाखेमार्फत विशेष मोहिम राबवून कारवाई करण्यात येणार आहे.

तरी नागरीकांनी वाहतूक नियमांचे पालन करुन त्यांचेवर होणारी दंडात्मक तसेच न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेकडुन करण्यात येत आहे.

(विशाल गायकवाड)
पोलीस उप आयुक्त
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned with CamScanner